MUNICIPAL CORPORATION OF GREATER MUMBAI

SOLID WASTE MANAGEMENT DEPARTMENT

INFORMATION OF

SOLID WASTE MANAGEMENT

DEPARTMENT UNDER SUB SECTION 4(1)(b)

OF CENTRAL GOVERNMENT'S

RIGHT TO INFORMATION

ACT-2005

Manual – VI

A statement of the categories of documents that are held by it or under its control of SWM Dept.

(Revised up to 31.03.2015)

<u>बृहन्मुंबई महानगरपालिका</u>

<u>(घन कचरा व्यवस्थापन खाते)</u>

<u>क्र.प्रअ/७२५२/घकव्य/आ-२/१००३ दि. ३० /७/२००४</u>

विषय:- घन कचरा व्यवस्थापन खात्यात अग्रहक्कक्रम नियमावलीनुसार नोकरी व खोली देण्याबाबतची रुपरेषा.

संदर्भ:- परिपत्रक क्र.प्रअ/७२५२/घकव्य/आस्था-२/१००३ दि.२१.७.२००४.

.....

मुंबई महानगरपालिकेची बिकट आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन घन कचरा व्यवस्थापन खात्यातील साफसफाई विभागात अग्रहक्कक्रम नियमावलीनुसार दिली जाणारी नोकरी व खोली देण्यास तत्कालीन महानगरपालिका आयुक्तांनी दि. १.८.२००० पासुन स्थगिती दिली होती. सदर स्थगिती संदर्भित परिपत्रकान्वये संपुष्टात आली आहे व आता सफाई कामगारांच्या वारसांना नोकरी व खोली देण्याची कार्यवाही सुरु करण्यात येत आहे. त्यासाठी संदर्भित परिपत्रकात नमूद केलेल्या बाबींची अंमलबजावणी करण्यासाठीची रुपरेषा खाली नमूद करण्यात आली आहे:-

<u>१) कार्यरत खाडाबदली कामगारांना रिक्त पदांवर सामावणे</u>:-

दि. १.८.२००४ पासुन साफसफाई विभागातील रिक्त पदांवर,सध्या कार्यरत असलेल्या जेष्ठतम, खाडाबदली कामगारांना सामावून घेण्याची कार्यवाही करण्यासाठी खाली नमूद केलेल्या रकान्यामध्ये आपल्या विभागातील रिक्त पदे व खाडाबदली कामगारांची जेष्ठता यादी प्रमुख अभियंता (घ.क.व्य.)कार्यालयास त्वरीत सादर करावी.तसेच आपल्या विभागात अद्याप कांही अतिरिक्त हंगामी कामगार रिक्त पदांवर सामावून घेण्यासाठी उपलब्ध असल्यास त्यांचीही यादी सादर करावी. सोबत कामगार / मुकादमांचे वाटप (staff allocation) दर्शविणारा तक्ता एकूण अनुसूचित कामगार / मुकादम संख्येसह, सादर करावा.

विभागवार रिक्त पदे व त्यावर सामावून घेतले जाऊ शकतील इतकी खाडाबदली कामगारांची संख्या दर्शवून प्रमुख अभियंता (घकव्य) यांची सामायीक मंजुरी घेऊन संबंधित आदेश विभाग कार्यालयांना पाठविण्यात येतील. तद्नंतर परिपत्रक क्र.प्रअ/ ९११९/ घकव्य/आप्र-८९३ दि.५.७.९९ सोबत जोडलेल्या, कामगारांना द्यावयाच्या नेमणूकीच्या-कायम झाल्याच्या आदेशाच्या नमून्यात कार्यालय अधिक्षक (घकव्य) यांनी खाडाबदली कामगारांना कार्यालयीन आदेश द्यावेत व त्यांची पोच घेऊन व तशी सेवाभिलेखात नोंद घेऊन त्याची पडताळणी करुन घ्यावी. या खाडाबदली कामगारांची जर सुरुवातीस महापालिका वैद्यकिय तपासणी झाली नसेल तर १.८.२००४ पासुन ६ महिन्याच्या कालावधीत त्यांची महापालिका वैद्यकिय तपासणी करुन घेंणे व तद्नंतर त्यांचे सेवाअभिलेख उघडून परिरक्षित करणे बंधनकारक आहे.

रिक्तपद यादी:-

क्रमांक	कामगाराचे नांव	पदनाम	पगारपत्रक क्रमांक	सेवा निवृत्तीचे कारण	दिनांक

खाडाबदली कामगार ज्येष्ठता यादी :-

क्रमांक	कामगाराचे नांव	जन्मदिनांक	खा.ब.का.म्हणून नेमणूकीचा दिनांक	म.वै.प. प्रमाणपत्र क्र.व दि. (असल्यास)	अति.हंगामी पदावरील नेमणूकीचा दिनांक

२) उर्वरित खाडाबदली कामगार :-

उर्वरित खाडाबदली कामगारांना ते सध्या घेत असलेले वेतन देण्यात यावे व भविष्यात वेळोवेळी रिक्त होणा-या पदांबाबत प्रथम या कार्यालयास,वरील प्रपत्रात,त्वरीत अवगत करावे.

एखादया विभागात रिक्त पदांची संख्य,उपलब्ध असलेल्या खाडाबदली कामगारापेक्षा, जास्त असल्यास तेथे सर्व रिक्त पदे भरली जाऊ शकणार नाहीत.तेथे कोणत्या खाडाबदली कामगारांना सामावून घ्यावयाचे ? याच्या उत्तरात २४ विभागातील रिक्त पदावर सामावून घेतले जाऊ न शकलेल्या उर्वरीत खाडाबदली कामगारांची एकत्रित ज्येष्ठता यादी त्यांच्या नियुक्ती दिनांक, म.वै.प.प्रमाणपत्र व जन्म दिनांकानुसार प्रमुख अभियंता (घ.क.व्य.) कार्यालयात बनविली जाईल.

३) अग्रहक्ककम नोकरी प्रकरणे ज्येष्ठतेने हाताळणे:-

आता अग्रहक्ककम नोकरीचा फायदा सेवेत असतांना मृत्यु पावलेल्या, वैद्यकियदृष्टया काम करण्यास असमर्थ ठरविण्यात आलेल्या,स्वेच्छा निवृत्ती घेतलेल्या,५५ वर्षानंतर सेवानिवृत्त झालेल्या आणि ५८ वर्षानंतर नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणा-या कामगारांच्या वारसानांही मिळणार आहे. या प्रकरणांची हाताळणी कामगारांच्या सेवानिवृत्ति दिनांकाच्या जेष्ठतेने होण्यासाठी खालील तीन गट पाडण्यात आलेले आहेत.

१) दि.१.८.२००० पर्यंत मंजुरी प्राप्त झालेली , मात्र नेमणूक न करण्यात आलेली खाडाबदली कामगार व खाडा बदली मुकादमांची प्रकरणे.

२) दि. १.८.२००० रोजी कार्यवाही चालू असलेली प्रकरणे

३) दि. १.८.२००० नंतर अग्रहक्ककम नियमावलीनुसार नोकरी देय होईल अशी प्रकरणे.

उपरोक्त तीन गटात, स्वतंत्रपणे आपल्या विभागामध्ये सध्या प्रलंबित असलेल्या एकूण प्रकरणांची संख्या अवगत होण्यासाठी, खालील रकान्यात त्याची यादी सादर करावी:-

प्रलंबित अग्रहक्ककम प्रकरणे यादी :-

गट क्रमांक	अनुक्रमांक	माजी कामगाराचे नांव	पदनाम	सेवा निवत्तीचे कारण	दिनांक	अग्रहक्कक्रम प्रकरण मंजुरी दिनांक (असल्यास)

दि.१.८.२००० पर्यंत मंजुरी प्राप्त झालेली,मात्र, नेमणूक न करण्यात आलेली खाडाबदली कामगार व खाडाबदली मुकादम यांची प्रकरणे प्राधान्यक्रमाने अवलोकनार्थ व अंतिम मंजुरीसाठी प्रमुख अभियंता (घ.क.व्य) कार्यालयात पाठवावी.

४) विहित प्रमाणक आणि वेतन :-

नविन खाडाबदली कामगार आणि खाडाबदली मुकादम यांची नेमणूक आपल्या विभागात अस्तित्वात असलेल्या अनुसूचित कामगार व मुकादम संख्येच्या अनुक्रमे ३० टक्के व २० टक्के या प्रमाणातच, प्रतिदिन रु.१२७/- या वेतनावर, करण्यात येईल. ३० टक्के व २० टक्के या प्रमाणात नेमणूक देण्याची कार्यवाही प्रमुख अभियंता (घ.क.व्य.) कार्यालयातून करण्यात येईल. तसेच नविन खाडाबदली कामगारांचीही एकत्रित जेष्ठता यादी या कार्यालयातूनच बनविण्यात येईल.

५) खाडाबदली मुकादम :-

आपल्या विभागांमध्ये सध्या उपलब्ध असलेली मुकादमांच्या रिक्त पदांची यादी व कार्यरत असलेल्या खाडाबदली मुकादमांची यादी प्रमुख अभियंता (घ.क.व्य.) कार्यालयास सादर करावी. या अनुषंगाने हल्लीच शहर/ पूर्व उपनगरे/ पश्चिम उपनगरे विभागात उप प्रमुख अभियंता (घकव्य) पातळीवर, मुकादम पदांवर १:१ या प्रमाणात पदोन्नतीने नियुक्ती देण्याचे प्रस्ताव हाताळले गेले आहेत. सदर प्रस्तावाच्या सर्व कागदपत्रांसह कायम कामगारांची निवड यादी, यापैकी ज्येष्ठतेने नियुक्ती दिलेल्यांची यादी, उर्वरित निवडलेल्या कामगारांची ज्येष्ठता यादी आणि आपल्या विभागातील खाडाबदली मुकादमांची एकत्रित ज्येष्ठता यादी व त्यापैकी मुकादमांपदी सामावून घेतलेल्यांची यादी प्रमुख अभियंता (घ.क.व्य.) कार्यालयास त्वरीत सादर करावी.यापुढे मुकादमांच्या रिक्त पदी उप विभागवार तयार करण्यात आलेल्या कायम कामगारांच्या निवड यादीतून, उपविभागवार १:१ प्रमाणात नेमणूका देण्यात येतील.मात्र उर्वरित खाडा बदली मुकादमांची विभागनिहाय असलेली ज्येष्ठता यादी त्यांच्या नियुक्ती दिनांक,म.वै.प.प्रमाणपत्र दिनांक व जन्म दिनांकानुसार एकत्रित स्वरुपात प्रमुख अभियंता (घ.क.व्य.) कार्यालयात परिरक्षित केली जाईल. यासाठी म्हणून आपल्या विभागात वेळोवेळी निर्माण होणा-या मुकादमांच्या रिक्त पदांबाबतची माहिती प्रमुख अभियंता (घ.क.व्य.) कार्यालयास उपरोक्त प्रपत्रात त्वरीत सादर करणे बंधनकारक आहे.

अग्रहक्कक्रम नोकरीचा उमेदवार जर १०वी (एस.एस.सी.)परिक्षा उत्तीर्ण / अनुत्तिर्ण झाला असेल किंवा १०वी पेक्षा जास्त शिक्षित असेल आणि त्याची स्वतःची खाडाबदली कामगार म्हणून नोकरी करण्याची इच्छा नसेल तर त्यास तत्कालीन परिस्थितीत खाडाबदली मुकादम म्हणूनच नोकरी हवी की नको याबाबत त्याने स्वतः निवेदन सादर करणे आवश्यक आहे.संबंधित उमेदवाराकडून अशा प्रकारचे थेट निवेदन घेण्याची कार्यवाही प्रमुख अभियंता (घ.क.व्य.) कार्यालय स्वतंत्रपणे करील.

इतःपर विभागातील अनुसूचित मुकादम संख्येच्या २० टवके प्रमाणात खाडाबदली मुकादमांच्या नेमणूकींचे काम प्रमुख अभियंता (घ.क.व्य.) कार्यालय करणार असल्याने,या कार्यालयाच्या सुचनेनुसार सहाय्यक मुख्य पर्यवेक्षक, खाडाबदली मुकादमांना महापालिका वैद्यकिय तपासणीसाठी पाठविण्याचे व त्यांना कामाची पहिली संधी देण्याचे काम पाहतील.

६) परिपत्रक क्र.प्रअ/१४७९४/घकव्य/आप्र-१४८८ दि. १८.८.९९ मध्ये विषद केलेल्या कार्यपध्दतीत सद्यस्थितीत करणे आवश्यक असलेले बदल :-

१) कार्यालय अधिक्षक (घकव्य) यांनी सहा.मुख्य पर्यवेक्षक यांच्या सहाय्याने अग्रहक्कक्रम नोकरीची प्रकरणे तयार करुन संबंधित उप मुख्य पर्यवेक्षक यांच्या मार्फत प्रमुख अभियंता (घकव्य) कार्यालयात सादर करावीत.

२) जेथे-जेथे उप प्रमुख अभियंता (घकव्य)असा उल्लेख असेल तेथे-तेथे प्रमुख अभियंता (घकव्य) असे वाचावे व त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

३) अनु.क्र.१०,११,१४,१५,२०,२१,२२(१०) व २४ आणि प्रपत्र ड,फ-२,फ-३ रद्द करण्यात येत आहे.

४) अनु.क्र.२ च्या कार्यवाहीमध्ये दप्तर तपासणी अहवालासोबत जोडलेले प्रपत्र १-ब चाही समावेश करावा.

५) अनु.क्र.८ च्या अनुषंगाने प्रपत्र 'क' मधील अग्रहक्कक्रम नोकरी आदेशाची प्रत इतःपर प्रमुख कर्मचारी अधिकारी व खाडाबदली मुकादमांच्या जेष्ठता यादीसाठी उप मुख्य पर्यवेक्षक कार्यालयांना पाठविणे आवश्यक नसल्यामुळे अग्रहक्कक्रम नोकरी आदेशाच्या फक्त ६ प्रती पुरविल्या जातील.

६) अनु.क्र.९(४) च्या अनुषंगाने इतःपर खाडाबदली कामगारांना महापालिका वैद्यकिय तपासणीसाठी पाठविण्याकरीता प्रमुख कर्मचारी अधिकारी कार्यालयाचे 'ना हरकत' प्रमाणपत्र मिळविणे गरजेचे नाही म्हणून विभाग कार्यालयांनी खाडा बदली कामगारांस कामाची प्रथम संधी देण्यापूर्वी महानगरपालिका वैद्यकिय परिक्षकांकडे शारीरीक पात्रतेचे प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी पाठवावे. तसेच अग्रहक्कक्रम नोकरी उमेदवाराने त्याच्या वयाबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा सादर न केल्यास महानगरपालिका वैद्यकिय तपासणीसाठी पाठवतांना दप्तर तपासणी अहवाला सोबत जोडलेले प्रपत्र १(ड) भरुन पाठवावे.

७)अनु.क्र.१६ च्या अनुषंगाने इतःपर नविन खाडाबदली कामगारांची प्रतिक्षा यादी प्रमुख अभियंता (घकव्य) कार्यालयाच्या पातळीवर एकत्रित स्वरुपात परिरक्षित केली जाणार असल्याने कदाचित माजी कामगाराचे सेवा निवासस्थान ज्या विभागामध्ये असेल

किंवा ते ज्या विभागामध्ये कार्यरत होते त्या विभागामध्ये त्यांच्या वारसास खाडाबदली कामगार / खाडा- बदली मुकादम म्हणून नियुक्ती मिळणार नाही. त्या वेळी सेवा निवासस्थान किंवा नियुक्तीचा विभाग बदलून देण्याची विनंती मान्य केली जाणार नाही.

८)अनु.क्र.१९ च्या अनुषंगाने, आता प्रमुख कामगार अधिकारी यांच्या कार्यालयाच्या पातळीवर विशेष अग्रहक्कक्रम नोकरी समिती अस्तित्वात नसल्याने , एखादया अग्रहक्कक्रम नोकरी प्रकरणामध्ये नियमानुसार नोकरी देता येत नसल्यास फक्त माजी कामागर सेवेत असतांना मृत्यु पावलेली / वैद्यकियदृष्टया काम करण्यास असमर्थ ठरविण्यात आलेली आणि अशा माजी कामगाराकडे सेवा निवासस्थान नसलेली प्रकरणे त्यांच्या वारसास अनुकंपातत्वावर वारसाच्या शिक्षणानुसार इतर खात्यात नोकरी देण्यासाठी प्रमुख कामगार अधिकारी यांच्या कार्यालयाकडे पाठविली जातील. तसेच माजी कामगाराकडे सेवा निवासस्थान असल्यास ते महापालिकेस त्वरीत परत देण्याच्या लेखी निवेदनासापेक्ष ती प्रकरणे पाठविली जातील.

९) अनु.क्र.२२(८) च्या अनुषंगाने प्रपत्र 'ब' वर चिटकविलेल्या अग्रहक्कक्रम नोकरी उमेदवाराच्या पारपत्र आकाराच्या प्रकाशचित्रावर फक्त विभागीय सहाय्यक मुख्य पर्यवेक्षक यांनी स्वाक्षरी करावी.

७)अग्रहक्कक्रम नोकरी नियमावलीतील कांही बदल :

१) नियम क्रमांक २(२) च्या अनुषंगाने एकूण सेवाकाल मोजतांना कामगार / मुकादमाने खाडाबदली म्हणून कामाची पहिली संधी मिळालेल्या दिनांकापासुन पुढे एकूण १० वर्षे सेवा केलेली असली पाहिजे किंवा सातत्याच्या सेवेमध्ये किमान ५ वर्षे सेवा पूर्ण केलेली असली पाहिजे.

२) नियम क्रमांक ३ च्या अनुषंगाने अग्रहक्कक्रमानुसार नोकरी मिळण्याबाबतचा अर्ज,माजी कर्मचा-याच्या अन्योन्य कारणाने सेवा समाप्तीच्या दिनांका पासून आणि अग्रहक्कक्रम नोकरी उमेदवार 'अज्ञान' असल्यास त्याचे वय १८ वर्षे पूर्ण झाल्यापासून, या दोन्ही बाबतीत २ वर्षाच्या कालावधीपर्यंतच स्विकारला जाईल.

८)इतर सूचना १) अग्रहक्कक्रम नोकरी बाबत मुलभूत स्वरुपाचे सर्व काम व त्यानुषंगाने एकच नोंदवही परिरक्षित करण्याची जबाबदारी विभाग कार्यालयातील मुख्य लिपिक (आस्थापना) यांची राहील.

२) विभागीय पातळीवर हे काम संबंधित सर्व 'वेतनपत्रक' लिपिकांनी मुख्य लिपिक (आस्थापना) यांच्या नियंत्रणाखाली करावे.

३) अग्रहक्कक्रम नोकरी प्रकरणे विभागीय पातळीवर परिपूर्ण अवस्थेत तयार करण्यासाठी आवश्यक असलेल्या जोडपत्रांची समग्र यादी दप्तर तपासणी अहवाला सोबत प्रपत्र १(क) अन्वये प्रसारीत केली आहे, ती नस्तीच्या टिप्पणी विभागात सर्वप्रथम जोडून योग्य ते पृष्ठ क्रमांक नमूद करुन प्रकरण सादर करणे आवश्यक आहे.

४)दप्तर तपासणी अहवालासोबत प्रपत्र १(ड) अन्वये अग्रहक्कक्रम धोरणा अंतर्गत नोकरी मिळण्याबाबतच्या अर्जाचे प्रपत्र प्रसारीत केले आहे.त्या नमुन्यामध्ये माजी कामगार किंवा त्यांच्या वारसाकडून अग्रहक्कक्रम नोकरीचा अर्ज घ्यावा.

५) अग्रहक्कक्रम नोकरी नोंदवहीमध्ये ऊजव्या पृष्ठावर,ऊजव्या कोप-यात उमेदवाराचे प्रकाशचित्र चिटकविणे आवश्यक आहे.

६) अग्रहक्कक्रम नोकरी आदेशाची एक प्रत संबंधित उमेदवारास बजाऊन त्याची पोच घेतलेली एक प्रत मुख्य कागदपत्रासोबत जोडून ठेवावी व दुसरी प्रत माजी कामगारांच्या सेवाअभिलेखात नोंद घेण्यासाठी पाठवावी.

७) संदर्भित परिपत्रकाच्या ८ व्या क्रमांकात नमूद केलेले परिपत्रक व अग्रहक्कक्रम नियमावली यामध्ये रद्द केलेल्या किंवा सुधारीत बदल केलेल्या मुद्दयांव्यतिरिक्त इतर सर्व बाबी जशाच्या तशा उपयोगात / अंमलात आणाव्यात.

वरील सविस्तर कार्यपध्दती,सुधारीत नियम,सुचना याप्रमाणे योग्य ती कार्यवाही करावी अन्यथा संबंधितांविरुध्द शिस्त भंगाची कारवाई केली जाईल.

मुख्य पर्यवेक्षक (घकव्य) **प्रमुख अभियंता (घकव्य)**

<u>स.मु.प.————विभाग/चाळी</u>

प्रत रवानाः-

१) उप प्रमुख अभियंता (घकव्य)शहर/पूर्व उपनगरे/पश्चिम उपनगरे

२)कार्यकारी अभियंता (परिवहन)शहर/पूर्व उपनगरे/पश्चिम उपनगरे/वैयक्तिक

३)उप मुख्य पर्यवेक्षक (घकव्य)परिमंडळ १,२,३,४,५,६

४)प्रशासकीय अधिकारी (घकव्य)

५)कार्यालय अधिक्षक (घकव्य)————-विभाग

६)चौकशी अधिकारी(घकव्य)परि१,२,३,४,५,६

७)मुख्य लिपिक आस्था.१,२,सर्वसाधारण,लेखा,आ.जा.

बृहन्मुंबई महानगरपालिका
घन कचरा व्यवस्थापन खाते
क्र.प्रअ/२४५/घकव्य/आ-२/१२५४

विषय :- साफसफाई विभागात सध्या कार्यरत असलेल्या ज्येष्ठतम खाडा बदली मुकादमांना व निवडलेल्या कामगारांना सामावण्याबाबत.

संदर्भ :- १) परिपत्रक क्र.प्रअ/७२५२/घकव्य/आस्था-२/१००३ दि.२१/७/२००४.
२) क्र.प्रअ/७२५२/घकव्य/आ-२/१००३ दि.३०/७/२००४.
३) क्र.प्रअ/९९०९/घकव्य/आ-२/१७४९ दि.२/९/२००४.

घन कचरा व्यवस्थापन खात्याच्या साफसफाई विभागात अग्रहक्कक्रम तत्वावर नोकरी व सेवानिवासस्थान देण्याबाबतचा निर्णय घेताना साफसफाई विभागातील रिक्त पदांवर सध्या कार्यरत असलेल्या खाडा बदली कामगारांना त्यांच्या ज्येष्ठतेनुसार सामावून घेण्यांत यावे व संबंधित पदाच्या वेतनश्रेणीतील वेतन त्यांना देण्यांत यावे तसेच उर्वरित खाडा बदलींना अशा प्रकारे भविष्यात क्रमशः रिक्त होणा-या पदावर सामावण्यांत यावे असे संदर्भ क्र.१ अन्वये म.न.पा. आयुक्तांनी निर्देश दिले आहेत. त्याप्रमाणे सर्व विभागातून आवश्यक ती माहिती प्राप्त करुन संदर्भ क्र.३ अन्वये खाडा बदली कामगारांना ज्येष्ठतेप्रमाणे सामावून घेण्याचे आकडेवारीसह सविस्तर आदेश देण्यांत आले आहेत. त्याच धर्तीवर सध्या उपलब्ध असलेली मुकादमांच्या रिक्त पदांची व कार्यरत खाडा बदली मुकादमांची यादी सर्व विभागातून प्राप्त करण्यांत आली आहे. शहर, पूर्व व पश्चिम उपनगर पातळीवर मुकादम पदांवर १:१ या प्रमाणात पदोन्नतीने नियुक्ती देण्याचे प्रस्ताव हाताळले होते. सदर सर्व प्रस्ताव पडताळून उपविभागनिहाय एकूण निवडलेले कामगार त्यापैकी आतापर्यंत मुकादम पदी सामावलेले कामगार, आता दि.१/१०/२००४ पर्यंतच्या रिक्त पद यादीनुसार मुकादमपदी सामावयाचे व उर्वरित कामगारांची संख्या सोबतच्या तक्त्यात नमूद केलेली आहे. याबरोबच विभागनिहाय खाडा बदली मुकादमांची दि.१/१०/२००४ रोजी विभागात कार्यरत असलेली आकडेवारी, त्यापैकी दि.१/१०/२००४ पर्यंतच्या रिक्त पदांवर सामावयाची आकडेवारी व उर्वरित आकडेवारी

सोबतच्या तक्त्यात नमूद केलेली आहे. तसेच विभागनिहाय असलेल्या अनुसूचित मुकादम पद संख्येच्या २० टक्के खाडा बदली मुकादमांची संख्या शेवटच्या रकान्यात नमूद केली आहे. त्यामधून उर्वरित विभागनिहाय खाडा बदली मुकादमांची संख्या वजा करून शेवटून दुस-या रकान्यात विभागनिहाय आवश्यक असलेल्या २० टक्के खाडा बदली मुकादम संख्येतील तूट जी अग्रहक्कक्रम नोकरीव्दारे भरली जाईल, ती नमूद केली आहे.

संदर्भ क्रमांक २) च्या टिप्पणीमध्ये, यापुढे मुकादमांच्या रिक्त पदी उपविभागवार तयार करण्यांत आलेल्या कायम कामगारांच्या निवड यादीतून उपविभागवार १:१ प्रमाणात नेमणूका देण्यांत येतील. मात्र उर्वरित खाडा बदली मुकादमांची विभागनिहाय असलेली ज्येष्ठता यादी त्यांच्य नियुक्ती, म.वै.प. प्रमाणपत्र व जन्म दिनांकानुसार एकत्रित स्वरुपात प्रमुख अभियंता (घ.क.व्य.) कार्यालयात परिरक्षित केली जाईल, असे नमूद केले होते. याबाबत कार्यरत खाडा बदली मुकादम व विविध संघटनांकडून आलेल्या अर्ज, विनंत्या लक्षात घेऊन सदर बाब पुनर्विलोकीत केली असता प्रामुख्याने दोन बाबी नजरेसमोर येतात. त्यापैकी एक म्हणजे उपविभागवार तयार करण्यांत आलेल्या कायम कामगारांच्या निवड यादीतून उपविभागवार १:१ प्रमाणात नेमणूका देण्यांत आल्या तरी वर नमूद केल्याप्रमाणे सध्या कार्यरत असलेल्या खाडा बदली मुकादमांची उपविभागवार यादी एकत्रित केल्यास कायम कामगारांना त्यांच्या उपविभागातच नेमणूक मिळेल. मात्र त्या उपविभागातील खाडा बदली मुकादमांना इतर उपविभागात जावे लागेल तसेच त्यांच्या ज्येष्ठता यादीत बदल झाल्यामुळे उपविभागवार, नजीकच्या काळात कायम मुकादम पदी पदोन्नती मिळू शकणा-यांना दीर्घ कालावधीनंतर पदोन्नती मिळेल आणि दुसरी म्हणजे उपविभागवार सदर प्रस्ताव हाताळले जात असताना त्यावेळी जर सर्व खाडा बदली मुकादमांची ज्येष्ठता यादी केली असती तर कदाचित तक्रारीला वाव नव्हता. मात्र आतापर्यंत त्यापैकी सुमारे १५० खाडा बदली मुकादम उपविभागवार ज्येष्ठता यादीप्रमाणे त्यांच्या उपविभागात सामावले गेले आहेत. त्यामुळे आता उर्वरित २१२ कार्यरत खाडा बदली मुकादमांवर एकत्रित ज्येष्ठता यादीने नैसर्गिक न्याय तत्वानुसार अन्याय संभवतो म्हणून या सर्व गोष्टींचा विचार करून

निवडलेल्या उपविभागनिहाय कामगाराप्रमाणेच सध्या कार्यरत असलेल्या एकूण २१२ खाडा बदली मुकादमांची उपविभागवार ज्येष्ठता यादी प्रमुख अभियंता (घ.क.व्य.) कार्यालयात परिरक्षित केली जाईल. आता सोबतच्या तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे उपविभागवार १:१ या प्रमाणात सामावयाच्या विभागनिहाय खाडा बदली मुकादमांची आकडेवारी स्पष्टपणे नमूद केलेली आहे. सोबतचा तक्ता काळजीपूर्वक पाहिला असता, हे लक्षात येईल की, सर्वांत वेगाने पश्चिम उपनगरातील कार्यरत खाडा बदली मकादम कायम मुकादम पदी सामावले जातील. तद्नंतर पूर्व उपनगरातील सामावले जातील. या दोन्ही उपनगरातील जुने खाडा बदली मुकादम संपुष्टात आल्यानंतर त्यावेळी उर्वरित असलेल्या शहर विभागातील खाडा बदली मुकादमांना त्यांच्या लेखी अर्जानुसार ज्येष्ठतेने उपनगरांमध्ये सामावले जाईल. सोबतच्या तक्त्यात दर्शविलेली सध्याची कार्यरत खाडा बदली मुकादमांची एकूण संख्या २१२ संपेपर्यंतच अशी उपविभागवार व वर नमूद केल्याप्रमाणे व्यवस्था अस्तित्वात राहिल. मात्र तद्नंतर रु.१२७/- या वेतनावर खाडा बदली मुकादमपदी नेमणूक मिळणा-या उमेदवारांच्या अग्रहक्कक्रम नोकरी आदेशात नमूद केल्याप्रमाणे त्यांची प्रमुख अभियंता (घ.क.व्य.) पातळीवर एकत्रित ज्येष्ठता यादी तयार केली जाईल व भविष्यात त्याप्रमाणेच त्यांना आवश्यकतेनुसार १:१ प्रमाणात कायम मुकादम पदी सामावले जाईल.

विभाग कार्यालयाकडून मुकादमांच्या रिक्त पदांचा मासिक अहवाल प्राप्त झाल्यानंतर उपविभागनिहाय निवड यादीतील उर्वरित ज्येष्ठतम कामगार व खाडा बदली मुकादमांच्या ज्येष्ठता यादीनुसार उपविभागवार कायम मुकादम पदी १:१ या प्रमाणात नेमणूका देण्याचे काम प्रमुख अभियंता (घ.क.व्य.) कार्यालय दर तीन महिन्यांनी करील. अशी नेमणूक करताना खाडा बदली मुकादम / कामगार म्हणून सध्या कार्यरत असणा-या विभागात पदोन्नतीने मुकादम पदी नेमणूक मिळणार नाही. तसेच एकदा पदोन्नतीने नेमणूक मिळाल्यानंतर किमान ३ वर्षे त्या विभागातून इतरत्र बदली केली जाणार नाही.

विभागातील अनुसूचित मुकादम संख्येच्या २० टक्के प्रमाणात खाडा बदली मुकादमांच्या नेमणूकीचे काम प्रमुख अभियंता (घ.क.व्य.) कार्यालयात करत असताना

इतःपर त्यांची एकत्रिक ज्येष्ठता यादी परिरक्षित केली जाणार असल्याने अग्रहक्कक्रम नोकरी उमेदवाराच्या लेखी विनंती अर्जानुसार त्यांना माजी कामगाराच्या विभागात किंवा सध्या राहत असलेल्या निवासस्थानाजवळील विभागात २० टक्के विहित प्रमाणकासापेक्ष खाडा बदली मुकादम म्हणून नेमणूक दिली जाईल.

माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी सोबतच्या तक्त्यासह प्रसारीत.

सोबत : एक तक्ता.

मुख्य पर्यवेक्षक (घ.क.व्य.) **प्रमुख अभियंता (घ.क.व्य.)**

सहाय्यक मुख्य पर्यवेक्षक (विभाग)

प्रत रवाना : उपमुख्य पर्यवेक्षक (परि.-१,२,३,४,५,६)
उपप्रमुख अभियंता (घ.क.व्य.) शहर / प.उ. / पू.उ.

प्रमुख अभियंता (घ.क.व्य.)

बृहन्मुंबई महानगरपालिका

(घन कचरा व्यवस्थापन खाते)

क्र.प्रअ/९४६५/घकव्य/आ-१ दि. ०९.०८.२०१०

परिपत्रक

विषय : सहा.मुख्य पर्यवेक्षक चाळी यांच्या अखत्यारीतील पर्यवेक्षक, चाळ राखणदार व संबंधित लिपिक व मुख्य लिपिक यांच्या कर्तव्य व्यवस्थेत फेरफार.

संदर्भ : १) क्र.प्रअ/१४७९३/घकव्य/आप्र-१४८७ दि.१८.०८.१९९९.

२) क्र.प्रअ/१७७९०/घकव्य/खाचौ-२७६६ दि.३०.१०.२०००.

उपरोक्त विषयासंदर्भा अनुषंगाने प्रमुख अभियंता (घकव्य) मध्यवर्ती कार्यालयाने सहा.मुख्य पर्यवेक्षक चाळी, पर्यवेक्षक, चाळ राखणदार संबंधीत लिपिक व मुख्य लिपिक यांची कर्तव्य व जबाबदा-या याबाबत यापूर्वीच परिपत्रक पारित केलेले आहे.

सद्यस्थितीत सहा.मुख्य पर्यवेक्षक चाळी यांच्या सन २००० सालापूर्वीपासून उपरोक्त परिपत्रकाअनुषंगाने योग्य ती कार्यवाही केली जात नाही असे निदर्शनास आले आहे. उदाहरणादाखल पर्यवेक्षक चाळी यांनी वार्षिक जनगणना करुन निवास नोंद वहया अद्ययावत ठेवावयाच्या आहेत. परंतु सह.मुख्य पर्यवेक्षक चाळी (शहर), पश्चिम उपनगरे, पूर्व उपनगरे यांच्या कार्यालयातील निवासी नोंद वहया नियमानुसार परिरक्षित करण्यात येत नाहीत. प्रसंगवशात महसूल मागणी नोंदवही त्यामुळे नियत वेळेत अद्यावत करता येत नाही. तसेच निवासी नोंद वहया परिपत्रकातील मार्गदर्शनानुसार अद्यावत केलेल्या नसल्याने प्रशासकीय कामकाजासाठी पुरविण्यात येणारी माहिती चुकीची दिली गेल्याने काही प्रकरणे कौटुंबिक कलहामुळे न्यायप्रविष्ठ असल्याने प्रलंबित आहेत. अशा प्रकरणांमुळे नोंदणीकृत कर्मचारी कामगार संघटना तसेच सामाजिक कार्यालयाकडून प्रशासकीय कामगारांबाबत चौकशी करण्याबाबत सतत विचारणा होत आहे.

सहा.मुख्य पर्यवेक्षक (चाळी) विभागात विस्कळीत झालेल्या पर्यवेक्षक (चाळी) व्यवस्थेत सक्षमीकरण करण्याच्या उद्देशाने उपरोक्त परिपत्रकानुसार नेमूण दिलेल्या कर्तव्यात सहा.मुख्य पर्यवेक्षक (चाळी), पर्यवेक्षक (चाळी), मुख्य लिपिक व संबंधीत लिपिक यांच्या कर्तव्यात अल्पसा फेरफार करण्यात येत आहे.

सहा.मुख्य पर्यवेक्षक (चाळी) यांच्या कार्यालयातील चाळ राखणदार यांच्या अखत्यारितील निवासी नोंद वही पूर्णता चाळ राखणदार यांनी नियमानुसार अद्यावत करुन वेळोवेळी सेवाशुल्क मागणी नोंदवहीत माहिती पुरविणे आवश्यक आहे. तसेच अग्रहक्कक्रम/वारसाहक्कक्रम नोकरी प्रकरण, भविष्य निर्वाह निधी, निवृत्तीवेतन दावा, गृहकर्ज, निवासी ओळखपत्र अशी निवासी नोंदवही संबंधाने निकाली काढावयाची कागदपत्रे, चाळ राखणदार यांनी तयार करुन सहा.मुख्य पर्यवेक्षक (चाळी) यांच्या कार्यालयातील संबंधीत लिपिक/मुख्य लिपिक यांच्यामार्फत पडताळणी केल्याबाबतची स्वाक्षरी घेऊन पर्यवेक्षक/सहा.मुख्य पर्यवेक्षक (चाळी) यांच्या स्वाक्षरीसाठी सादर करावीत. सहा. मुख्य पर्यवेक्षक(चाळी) पूर्व उपनगरे व पश्चिम उपनगरे विभागात लिपिक व मुख्य लिपिक पद नसेल तर उप मुख्य पर्यवेक्षक (घकव्य) पूर्व उपनगरे व पश्चिम उपनगरे विभागातील लिपिक व मुख्य लिपिक सदर काम पाहतील.

तसेच चाळीमध्ये सेवा निवासस्थानात राहणा-या कर्मचा-याचे उपदानाव्यतिरिक्त इतर दावे हे विहित कालावधीत मंजूर करून अधिदान सेवानिवृत्तीच्या दुस-या दिवशी मिळेल अशी व्यवस्था करावी व उपदान हे वारसाहक्क प्रकरण मंजूर झाल्यावर एक महिन्याच्या कालावधीत सेवानिवृत्त कर्मचा-यास मिळेल याची काळजी घ्यावी

संदर्भित परिपत्रकात नमूद करण्यात आलेली कर्तव्य/जबाबदा-या यात काहीही बदल करण्यात आलेले नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

सही/- ०६.०८.२०१०
प्रमुख अभियंता (घकव्य)प्र.

प्रति :-
उप प्रमुख अभियंता (घकव्य) शहर, पूर्व/उप, प/उप
उप मुख्य पर्यवेक्षक परि (घकव्य)
सहा.मुख्य पर्यवेक्षक विभाग (घकव्य)
सहा.मुख्य पर्यवेक्षक (चाळी) शहर, पूर्व/उप, प/उप
कार्यालय अधिक्षक विभाग (घकव्य)

बृहन्मुंबई महानगरपालिका
(घन कचरा व्यवस्थापन खाते)
क्र.प्रअ/९०५६/घकव्य/आ-१ दि. २१.०७.२०१२

परिपत्रक

विषय : घन कचरा व्यवस्थापन खात्यातील साफसफाई विभागात काम करणा-या कामगार – कर्मचा-यांची शैक्षणिक अर्हता व जात त्यांच्या सेवा अभिलेखात नोंदविण्याबाबत.

उपरोक्त विषयानुषंगाने मुंबई महानगरपालिकेच्या इतर खात्यातील संवर्गात स्थायी तसेच अस्थायी पदावर काम करणा-या कामगार – कर्मचा-यांचे नांव, पत्ता, पदनाम, शैक्षणिक अर्हता, वय, जात, वेतनश्रेणी इत्यादी स्वरूपाची संपूर्ण माहिती त्यांच्या सेवा अभिलेखात अंतर्भत करून सेवा अभिलेख जतन केला जातो.

घन कचरा व्यवस्थापन खात्यात काम करणा-या साफसफाई विभागातील कामगार - कर्मचा-यांच्या सेवा अभिलेखात कामगाराची जात व शैक्षणिक अर्हता अंतर्भत केलेली निदर्शनास येत नाही याबाबत या कार्यालयात मान्यता प्राप्त संघटना तसेच लोकप्रतिनिधी वारंवार तक्रारी करत असतात ही बाब अत्यंत गंभीर स्वरूपाची असल्यामुळे संबंधित मुख्य लिपिक/कार्यालय अधिक्षक यांना निर्देश देण्यात येत आहे की, आपल्या विभाग कार्यालयातील कामगार-कर्मचा-यांच्या सेवा अभिलेखात कामगार – कर्मचा-याची जात व शैक्षणिक अर्हता याची नोंद आवश्यक त्या प्रमाणपत्रासापेक्ष घेण्यात यावी. जेणेकरून त्यांना पदोन्नती देताना शैक्षणिक अर्हतेचा व जातीचा विचार केला जाईल. तसेच घन कचरा व्यवस्थापन खात्याच्या अग्रहक्कक्रम / वारसाहक्कक्रम नोकरी नियमावलीनुसार नोकरी प्रकरण मंजुरीकरिता सादर करताना देखील प्रपत्र-ब मध्ये उमेदवाराची जात व शैक्षणिक अर्हता नमूद करावी. त्यानुसार उमेदवाराच्या शैक्षणिक अर्हतेनुसार नोकरी प्रकरण मंजुरीकरिता कार्यान्वित करता येईल.

यास्तव, सहाय्यक अभियंता (घकव्य)/कार्यालय अधिक्षक (घकव्य)/सहाय्यक मुख्य पर्यवेक्षक(घकव्य) यांनी आपल्या विभागातील कामगार- कर्मचा-यांना जातीचे प्रमाणपत्र व शैक्षणिक अर्हतेबाबतचे प्रमाणपत्र कार्यालयात जमा करण्याबाबत योग्य ते निर्देश देण्यात यावेत व सदर परिपत्रकास आपल्या विभाग कार्यालयातील चौकीवर प्रसिध्दी देण्यात यावी.

सही/- २०.०७.२०१२
प्रमुख अभियंता (घकव्य)प्र.

प्रति :-
मुख्य पर्यवेक्षक(घकव्य)
प्रशासकीय अधिकारी(घकव्य)
उप मुख्य पर्यवेक्षक (घकव्य)परि- १ ते ७
सहाय्यक अभियंता (घकव्य) ए ते टी विभाग
सहा.मुख्य पर्यवेक्षक (घकव्य) विभाग
कार्यालय अधिक्षक विभाग (घकव्य)
मुख्य लिपिक(घकव्य) विभाग

बृहन्मुंबई महानगरपालिका
(घन कचरा व्यवस्थापन खाते)
क्र.प्रअ/१५६३५/घकव्य/आ-२ दि. १०.१०.२०१२

परिपत्रक

विषय : घन कचरा व्यवस्थापन खात्यातील सर्व चौकशी अधिका-यांना उप प्रमुख अधिकारी(चौकशी) खात्यांतर्गत चौकशी विभागाकडून आलेल्या संक्षिप्त खात्यांतर्गत चौकशी प्रकरणांची प्रकरणे हाताळण्याबाबत अधिकार प्रदान करणे.

संदर्भ : १) एमओएम/७५४९ दि. १६.०१.१९९२
२) सीएचओईडी/डी/जन/३८१५ दि. ०३.०४.२०००.

प्रमुख अभियंता (घकव्य) यांच्या आस्थापनेवर घन कचरा व्यवस्थापन खात्यातील कर्मचा-यांविरूध्द शिस्त भंग विषयक चौकशीचे आदेश देण्याचे व त्यांना आदेश फर्माविण्याचे अधिकार उपरोक्त संदर्भ क्र-१नुसार खातेप्रमुख यांना प्रदान करण्यात आले आहे. त्यानुसार प्रमुख अभियंता (घकव्य) मध्यवर्ती कार्यालयातून खात्यांतर्गत चौकशीचे काम केले जाते.

घन कचरा व्यवस्थापन खात्यातील कर्मचा-यांना संक्षिप्त खात्यांतर्गत प्रकरणात चौकशीचे काम करताना कर्मचा-याला ज्ञापन देणे दोषारोप देणे व कर्मचा-याचे निवेदन प्राप्त झाल्यावर शिक्षाआदेश तयार करून त्यांना शिक्षाआदेश बजावणे, नोंद वहीत नोंद घेणे तसेच उप प्रमुख अधिकारी (चौकशी) खात्यांतर्गत चौकशी विभाग यांना कार्यपुर्तीचा अहवाल सादर करणे अशी कामे प्रमुख अभियंता(घकव्य) मध्यवर्ती कार्यालयातून केली जातात.

घन कचरा व्यवस्थापन खात्यातील कर्मचा-यांची संख्या, कर्मचा-यांच्या मोठया प्रमाणावर उद्भवणारी संक्षिप्त खात्यांतर्गत चौकशीचे प्रकरणे लक्षात घेता सदर प्रकरणे कमीत कमी वेळात निकाली काढण्यासाठी या कार्यालयातील दोन लिपिकांकडून निपटारा करणे शक्य होत नाही.

उपरोक्त बाब लक्षात घेता घन कचरा व्यवस्थापन खात्यातील परि -१ ते ७ या विभागात नियुक्त केलेल्या घन कचरा व्यवस्थापन खात्याचे चौकशी अधिकारी यांच्यामार्फत परिपत्रक क्र.सीएचओईडी/डी/जनरल/३८१५ दि.०३.०४.२००० अन्वये परिमंडळानुसार त्याविभागातील कर्मचा-यांची उप प्रमुख अधिकारी (चौकशी) खात्यांतर्गत चौकशी विभाग यांच्या कार्यालयातुन प्रमुख अभियंता (घकव्य) / मुख्य पर्यवेक्षक (घकव्य) यांना प्राप्त झालेल्या संक्षिप्त खात्यांतर्गत चौकशीची प्रकरणे हाताळली जातील. व कार्यपुर्तीचा अहवाल वेळोवेळी प्रमुख अभियंता (घकव्य) / मुख्य पर्यवेक्षक (घकव्य) यांना सादर करतील. सदर कार्यपुर्तीचा अहवाल प्रमुख अभियंता (घकव्य) मध्यवर्ती कार्यालयामार्फत उप प्रमुख अधिकारी (चौकशी) खात्यांतर्गत चौकशी विभाग यांना सादर करण्यात येईल.

सही/- १०.१०.२०१२
प्रमुख अभियंता (घकव्य)प्र.

प्रत :-
सह प्रमुख कर्मचारी अधिकारी (घकव्य)
प्रशासकीय अधिकारी(घकव्य)
कार्यालय अधिक्षक विभाग (घकव्य)
चौकशी अधिकारी (घकव्य)परि-

बृहन्मुंबई महानगरपालिका
(घन कचरा व्यवस्थापन खाते)
क्र.प्रअ/१३६२६/घकव्य दि. ०१.१०.२०१०
परिपत्रक

विषय : प्रमुख लेखापाल (कोषागार) यांच्या दालनात आयोजितकरण्यात येत असलेल्या "पेन्शन अदालती" बाबत.
संदर्भ : एफपीपी/एफआय/८४२ दि. २९.०७.२०१०.

महानगरपालिकेतील निवृत्तीवेतनधारक त्यांच्या विविध समस्याकरिता सतत आयुक्त कार्यालयाशी पत्रव्यवहार करतात. त्यांच्या प्रलंबित प्रकरणांचा पाठपुरावा करण्याकरिता मा. आयुक्त यांच्या निर्देशानुसार प्रमुख लेखापाल (कोषागार) यांच्या दालनात दर महिन्याच्या पहिल्या मंगळवारी "पेन्शन अदालत" सुरु करण्यात आलेली आहे. त्यानुसार मंगळवार दि. १४.०९.२०१० रोजी सकाळी ११.३० वाजता पेन्शन अदालतीचे आयोजन करण्यात आले व सदर पेन्शन अदालतीमध्ये खालील प्रमाणे निर्देश देण्यात आले.

महानगरपालिकेतील कर्मचारी मृत्यू पावल्यास त्यांच्या वारसास म.न.पा. अग्रहक्कक्रम/वारसाहक्कक्रम/अनुकंपा नियमावलीनुसार मृत कर्मचा-यांच्या वारसाा वरील नियमानुसार नोकरी मंजूर करून प्रत्यक्ष दिल्यानंतर प्रमुख लेखापाल (कोषागार) यांना सदर नियुक्तीबाबत माहिती देणे आवश्यक आहे, जेणेकरून कुटुंब निवृत्ती वेतन धारकाला कुटुंब निवृत्ती देतांना महागाई भत्ता आकारणीबाबत योग्य ती कार्यवाही प्रमुख लेखापाल (कोषागार) यांना करता येईल.

यास्तव कृपया सहाय्यक अभियंता (घकव्य), कार्यालय अधिक्षक (घकव्य), सहाय्यक मुख्य पर्यवेक्षक (घकव्य) यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी मृत कर्मचा-यांच्या वारसास नोकरी दिल्यानंतर मृत कर्मचा-यांचा कर्मचारी संकेतांक व नवीन नेमणूक केलेल्या कर्मचा-यांच्या कर्मचारी संकेतांकासह सदर माहिती प्रमुख लेखापाल (कोषागार) यांना द्यावी.

सही/- ०१.१०.२०१०
प्रमुख अभियंता (घकव्य)प्र.

सहाय्यक अभियंता (घकव्य) विभाग
कार्यालय अधिक्षक (घकव्य) विभाग
सहा.मुख्य पर्यवेक्षक (घकव्य) विभाग

बृहन्मुंबई महानगरपालिका
(घन कचरा व्यवस्थापन खाते)
क्र.प्र.अ/९९३३/घकव्य दि.१५.११.२०१०

परिपत्रक

विषय:- घ.क.व्य.खात्यातील मृत कर्मचा-यांचे दावे निकाली काढण्याकरिता वारसदार/दावेदार यांच्याकडून घेण्यात येणा-या ओळखनामा/ हमीपत्राबाबत.

घन कचरा व्यवस्थापन खात्याच्या प्रचलित कार्यपध्दतीनुसार कर्मचा-यांच्या वारसदार/दावेदार यांच्या कुटुंबनिवृत्तीवेतन/भ.नि.नि./नोकरी प्रकरण दाव्यकरिता ओळख पटविण्याकरीता त्यांना ओळखणा-या दोन महानगरपालिका कर्मचा-यांकडून स्टॅम्प पेपरवर लेखी ओळखनामा घेण्यात येतो मात्र या ओळखनाम्यावर वारसदाराचा फोटो लावण्याची पध्दत नाही. केवळ या ओळखनाम्याच्या आधारे कर्मचा-यांचे देय दावे निकालात काढण्यात येतात.

सहाय्यक मुख्य पर्यवेक्षक (घ.क.व्य.) एच/पूर्व विभागातील अशाच एका प्रकरणी श्रीम.परंजा उर्फ वसंधा ही मृत कर्मचारी कै.मुत्तुस्वामी हरीजन, संमार्जक यांची पत्नी असल्याबाबत श्री.रामस्वामी कंदास्वामी व कानन रामस्वामी कामगार स.मु.प. एच/पूर्व या दोघांनी ओळखनाम्यावर स्वाक्ष-या केल्या होत्या त्या आधारे कुटुंबनिवृत्ती वेतन दावा निकाली काढण्यात आला होता. या ओळखनामा/हमीपत्रावर श्रीम.परंजा यांचा फोटो नव्हता व त्यामुळे तक्रारदार स्त्रीने तक्रार केल्यानंतर मृत कामगाराच्या ख-या पत्नीबाबत प्रश्न निर्माण झाला यास्तव या घटनेनंतर उप मुख्य पर्यवेक्षक (घ.क.व्य.) परि-३ कार्यालयाने मृत कामगाराच्या वारसाकडून घ्यावयाच्या ओळखनामा/हमीपत्रामध्ये सुधारणा करुन त्यावर दावेदाराची फोटो लावण्याची पध्दत कार्यान्वित केली आहे.

अशीच कार्यपध्दत घन कचरा व्यवस्थापन खात्याच्या सर्व उपविभागातील कार्यालयात कार्यान्वित करण्याबाबत उप प्रमुख अधिकारी (चौकशी) परि-३ यांनी प्रस्ताविल्यानुसार उपायुक्त (पर्यावरण व कचरा व्यवस्थापन) यांनी क्र.उपाआयुक्त/पर्या.क.व्य./४९८ दि.०४.०८.२०१० अन्वये आदेश दिले असून सुधारित ओळखनामा/हमीपत्राचा नमुना प्रत माहितीकरीता सोबत जोडण्यात येत आहे.

तसेच दावेदाराकडून आयकर खात्याने दिलेले पॅनकार्ड आणि निवडणूक अधिका-याने दिलेले मतदान ओळखपत्राची सत्यप्रत घेण्यात यावी. त्याचप्रमाणे दावेदारांकडून घेण्यात येणा-या विविध प्रतिज्ञापत्रावर सही करणा-या व्यक्तींचे फोटो लावण्यात यावेत. तरी कर्मचा-यांचे देय दावे निकालात काढतेवेळी सदर परिपत्रकाप्रमाणे अंमलबजावणी करण्यात यावी.

सर्व सहाय्यक मुख्य पर्यवेक्षक, कार्यालय अधिक्षक (घ.क.व्य.), उप मुख्य पर्यवेक्षक यांनी सदर परिपत्रकास व्यापक प्रमाणात प्रसिध्दी द्यावी.

प्रमुख अभियंता (घ.क.व्य.)

उप प्रमुख अभियंता (घ.क.व्य.)
उप मुख्य पर्यवेक्षक (घ.क.व्य.)परिमंडळ – .
सहाय्यक मुख्य पर्यवेक्षक (घ.क.व्य.)
कार्यालय अधिक्षक (घ.क.व्य.)

(रु. १०० च्या स्टॅम्प पेपरवर घेणे)

दिनांक :

हमीपत्र

दावेदारांचा फोटो

वर चिटकविण्यात आलेला फोटो हा दावेदार श्री/श्रीमती. यांचा असून सदर दावेदार व्यक्ती महानगरपालिकेच्या घन कचरा व्यवस्थापन खात्यातील सहाय्यक मुख्य पर्यवेक्षक _____विभागातील दिवंगत कर्मचारी श्री/श्रीमती. पदनाम _____कर्मचारी संकेतांक _____ यांची /यांचा कायदेशीर पती/पत्नी _____ असून आम्ही खाली सही करणार

१) श्री/श्रीमती. _____ कर्मचारी संकेतांक _____.

पदनाम _____ खाते_____.

पत्ता: _____.

२) श्री/श्रीमती. _____ कर्मचारी संकेतांक _____.

पदनाम _____ खाते_____.

पत्ता_____.

येथे सध्या कार्यरत असून वरील दावेदार व्यक्तीस सुमारे वर्षापासून ओळखत आहोत, असे खात्रीलायकपणे लिहून देत आहोत. तरी माजी कर्मचारी श्री./श्रीमती _____यांच्या पश्चात अनुज्ञेय असणारे दावे. १) कुटुंब निवृत्ती वेतन २) भविष्य निर्वाह निधी इत्यादी श्री.श्रीमती_____यांना देण्यात यावेत.

सदर हमीपत्र आम्ही समजून उमजून देत असून त्यात काही खोटे आढळल्यास आमच्याविरुध्द योग्य ती कारवाई करण्यात यावी.

क्र.१	हमीदाराचा फोटो	हमीदाराची सही _____. नाव _____.
क्र.१	हमीदाराचा फोटो	हमीदाराची सही _____. नाव _____.

उपरोक्त हमीपत्र हमीदारांस समजावण्यात आलेले आहे व
त्यांनी माझ्या समक्ष सही केली/अंगठा दिलेला आहे.
स.मु.प. _____ विभाग

(टिप: दावेदाराच्या फोटोच्या उजव्या भागावर हमीदारांनी स्वाक्ष-या कराव्या व फोटोच्या डाव्या भागावर स.मु.प. यांनी स्वाक्षरी. तसेच हमीदारांनी त्यांच्या स्वत:च्या फोटोवरसुध्दा सही करावी. हमीदार महानगरपालिका कर्मचारी असावेत व त्यांचे ओळखपत्राची प्रत घेण्यात यावी.)

बृहन्मुंबईमहानगरपालिका

(घनकचरा व्यवस्थापन खाते)

निविदा सुचना

स्वच्छ मुंबई अभियान अंतर्गत मुंबई महानगरपालिका आयुक्त इच्छुक संस्था उदा.नोंदणीकृत संस्था, नोंदणीकृत कामगार सहकारी संस्था, अशासकिय संस्था यांच्या मार्फत रस्ते सफाई या कामासाठी कंत्राट पध्दतीने कंत्राट सुरु झाल्यापासुन ७ महिन्याच्या कालावधीसाठी मोहरबंद निविदा मागवित आहे. स्वच्छतेसाठी "ठराविक एकक दरह्न या पध्दतीवर काम आधारीत असेल यासाठी संस्थेची निवड व कामाची विभागणी निवेदीमध्ये निर्देशित केल्याप्रमाणे सोडत काढुन करण्यात येईल.

कंत्राटी कामगार(नियम व निर्मुलन)१९७० अन्वये परवाना असलेल्या संस्था (परवाना नसल्यास संस्थेने परवाना मिळवुन त्याची छायाप्रत काम सुरु होण्याआधी देणे आवश्यक आहे.) जे साफसफाई या कामासाठी "ठराविक एकक दरह्न व इतर निर्देशित नियम व अटीनुसार काम करण्यास इच्छुक आहेत अशानिच अर्ज करावा. अशासकीय संस्था, नोंदणीकृत कामगार सहकारी संस्था यांना दिवसा किंवा रात्री साफसफाई करणे यातील कोणतेही एकच काम मिळेल. नोंदणीकृत बेरोजगार कामगार संस्था, अशासकीय संस्था यांनी नोंदणी प्रमाणपत्राची मूळप्रत सादरकेल्यानंतरच माहिती व निविदा विकण्यात येईल.

अ) इच्छुक निवेदीकारांना सर्व माहिती व निविदा प्रमुख अभियंता (घकव्य) ४था माळा, छत्रपती शिवाजी मंडई, माता रमाबाई आंबेडकर रोड, मुंबई-४०० ००१ या कार्यालयात कोणत्याही कामाच्या दिवशी लेखी अर्ज व रु.५००/- ₹ १५.३ ₹ विक्रीकर या किमतीत दि.०२/०५/०५ ते दि.०७/०५/०५ या दिवशी सकाळी ११.०० वा. ते दुपारी ०४.०० पर्यंत दुसरा व चौथा शनिवार सोडुन इतर कामाच्या दिवशी उपलब्ध आहेत.

ब) निविदा मोहरबंद पाकिटात त्या पाकीटावर निविदेचा विषय नियत दिनांक व संस्थेचे नाव लिहावे. मोहरबंद निविदा दि.१०/०५/०५ त्याच दिवशी दुपारी ०१.०० पर्यंत प्रमुख अभियंता (घकव्य) कार्यालयात वर दर्शविलेल्या पत्तयावर सादर कराव्यात.

क) निविदाकाराने निवेदेची अनामत रक्कम बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या नावाने डीडी काढुन कुठल्याही कामाच्या दिवशी निविदा भरण्याच्या आदल्या दिवसापर्यंत सकाळी ११.०० ते ०४.०० दुसरा व चौथा शनिवार सोडून वर निर्देशित पत्त्यावर भरावी

निवेदेची अनामत रक्कम इतर कोणत्याही पध्दतीने किंवा नियत तारखेस स्विकारली जाणार नाही.

ड) ज्या नोंदणीकृत संस्थानी महानगर पालिकेत स्थायी अनामत रक्कम भरली आहे त्यांनाही या निवेदेसाठी पुन्हा नव्याने अनामत रक्कम भरावी लागेल.

इ) निविदा टपालाव्दारे पाठविल्या जाणार नाही.

फ) पात्र झालेल्या निविदांची सोडत नायर इस्पितळ रुग्णालय, मुंबई-८ येथील सभागृहात दि.२०/०५/०५ रोजी दुपारी ०२.०० वाजता करण्यात येईल.

प्रमुख अभियंता (घकव्य)

बृहन्मुंबई महानगरपालिका

विषय : बृहन्मुंबईतील रस्ते साफसफाई व कचरा संकलनासाठीचे कंत्राट .

पात्रतेसाठी - सुचनापत्र

आयुक्त, मुंबई महानगरपालिका, मुंबई शहरातील रस्ते सफाईच्या कामासाठी, 9एकक" तत्वावर, निर्देशित केलेल्या विभागात कंत्राट पध्दतीने काम सुरु झाल्याच्या तारखेपासुन ७ महिन्याच्या कालावधीसाठी, पात्रतेसाठी निविदा मागवत आहेत. निविदा भरण्यापूर्वी खालील ठळक बाबी लक्षात घ्याव्यात.

१	कामाच्या विभागवार एककांची संख्या	प्रपत्र 'अ' प्रमाणे
२	कामाचा तपशील	बृहन्मुंबई महानगरपालिका इच्छुक संस्थेकडुन संस्था नोंदणीकृत कामगार सहकारी संस्था व अशासकिय संस्था यांच्याकडुन रस्ते साफ करणे व कचरा संकलन यासाठी निर्देशित केलेल्या विभागात कंत्राट पध्दतीने काम सुरु झाल्यापासुन सात महिन्याच्या कालावधीसाठी पात्रतेसाठी निविदा मागवित आहे. कामांची सविस्तर माहिती प्रपत्र 9अ" मध्ये समाविष्ट केली आहे. हे काम एक समान नाही तसेच ते सर्व विभागात विभागलेले आहे. महापालिका आयुक्तांनी प्रशासकीय कारणास्त्व कोणतीही पूर्व सुचना न देता काम वाढविणे, रद्द करणे किंवा कमी करणे हे सर्व अधिकार राखुन ठेवले आहेत. प्रत्येक कामाची सविस्तर माहिती स्वच्छता 9एकक" यांची निविदा सुची मध्ये दिलेली आहे. कामाचे स्वरुप 9स्वच्छता एकक" यासाठी 9ठरावीक एकक दर" या तत्वावर अवलंबुन आहे. संस्थेची निवड व कामाचे वाटप हे म.न.पा.आयुक्तांनी मंजुर केलेल्या सोडत पध्दतीने करण्यात येईल. ज्या संस्थेकडे कंत्राटी कामगार (नियम व निर्मुलन)१९७० अन्वये परवाना (जर परवाना नसेल त्यासंस्थांनी परवाना घेऊन त्याची छायाप्रत कामसुरु झाल्यापासुन दोन महिन्याच्या आत सादर करावे) आहे अशा ज्या संस्था स्वच्छता एकक यासाठी ठराविक एकक दर या तत्वावर काम करण्यास इच्छुक आहेत व ज्यांना अटी व शर्ती मंजुर आहेत त्यांनीच अर्ज करावेत. नोंदणीकृत संस्था, कामगार सहकारी संस्था, अशासकीय संस्था यांना दिवसा / रात्री स्व्च्छता यापैकी कोणत्याही एकाप्रकारचे काम दिले जाईल.

३	या कामासाठी कोण अर्ज करु शकतात	ज्यांच्याकडे कंत्राटी कामगार नियम निर्मुलन कायदा १९७० अन्वये परवाना आहे व ज्यांची नोंदणी ०१/०६/०३ पूर्वी झालेली आहे अशा सर्व नोंदणीकृत कामगार सहकारी संस्था, अशासकीय संस्था या कामासाठी पात्र ठरु शकतील. तसेच स्वच्छ मुंबई अभियान पध्दतीनुसार ज्या संस्थानी बृहन्मुंबई महानगरपालिकेसाठी गेल्या वेळेस काम केले आहे व अशा सर्व संस्था, त्यांच्या चांगल्या कामाच्या मूल्यमापनासापेक्ष, या कामासाठी पात्र ठरतील. ज्यांच्याकडे हा परवाना नसेल त्यांना काम सुरु झाल्यापासून दोन महिन्यात तो सादर करण्याचे हमीपत्र रु.२०/- स्टॅम्पपेपरवर देऊन निविदेसोबत जोडले पाहिजे. ज्या संस्था काळया सूचीत आहेत किंवा ज्या संस्थांचे काम बृहन्मुंबई महानगरपालिकेला समाधानकारक वाटले नाही म्हणुन त्यांना काढुन टाकले आहे अशा संस्थांचे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. ज्या संस्थेने अर्ज केला आहे त्यांना निविदा सुचीतील इतर अटींशिवाय कामाच्या ठिकाणी स्वतः सकाळी ०६.०० ते दुपारी ०३.०० वा. पर्यंत दिवसाच्या कामासाठी व रात्रपाळीच्या कामासाठी रात्री ११.०० ते सकाळी ०५.०० पर्यंत कामावर देखरेख व कार्यवाही या कारणास्तव उपस्थित रहावे लागेल. कामाच्या जागेवर त्यांच्या व्यतिरीक्त दुसरा प्रतिनिधी चालणार नाही. ज्या संस्था काळया सूचीत आहेत किंवा ज्या संस्थांचे काम बृहन्मुंबई महानगरपालिकेला समाधानकारक वाटले नाही म्हणुन त्यांना काढून टाकले आहे त्या संस्थांनी या कामासाठी अर्ज करु नये कारण अशा संस्थानाआपोआपच अपात्र ठरविण्यात येईल.
४	अर्ज कोठे, कसे व कधी मिळतील	अर्ज व निविदासुची ज्यामध्ये स्वच्छता एकक, एकक दर अनामत रक्कम माहिती तसेच पूर्ण करण्याच्या सर्व अटी व शर्ती असलेल्या निविदा सर्व संस्थाना प्रशासकीय अधिकारी(घकव्य), पलटण रोड, मुंबई-४०० ००१ यांच्या कार्यालयातुन लेखी अर्ज व रु.५००/- ₹ १५.३ ₹ विक्रीकर रोख स्वरुपात किंवा राष्ट्रीयकृत बँकेचा डी.डी. बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त या नावाने काढुन विकत घेऊ शकतात. निविदा पध्दतीत यशस्वी म्हणुन घोषित संस्थाना कंत्राट अनामत रक्कम म्हणुन रु.२५०००/- डी.डी.व्दारे भरावे लागतील. **अनामत रक्कम** जे अर्ज करु इच्छितात त्या संस्था, नोंदणीकृत कामगार सहकारी संस्था, अशासकीय संस्था यांनी रु.१०,०००/- अर्जासोबत अनामत रक्कम भरणे आवश्यक आहे. ज्या बेरोजगार संस्थांना काम देण्यात आले आहे त्यांनी रु.१०,०००/- इसारा अनामत रक्कम भरणे

		आवश्यक आहे. (कारण त्यांना रोजगार देण्यात आला आहे.) बेराजगार संस्थांना काम मिळाल्यास कार्यादेश मिळण्यासाठी सदर संस्थेने रु.२५०००/- सुरक्षा अनामत रक्कम भरणे आवश्यक आहे. अर्ज विक्रीसाठी दि.०२/०५/०५ पासुन कार्यालयीन वेळेत मिळतील. अनामत रक्कम रु.१०,०००/- पर्यंत भरावे लागतील नियत दिनांकाच्या दिवशी अनामत रक्कम स्विकारली जाणार नाही. भरलेले अर्ज इतर आवश्यक कागदपत्रांसहीत प्रशासकीय अधिकारी(घकव्य) यांच्या कार्यालयात १०/०५/०५ अथवा तत्पूर्वी दुपारी ०१.०० वा. पर्यंत पाठवावित.
५	अर्ज कसे भरावेत	अर्ज बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्तांच्या नावे असावा व त्यावर 9रस्ते साफसफाई व संकलित कचरा अर्ज" असे नमुद केलेल्या मोहरबंद पाकिटातून पाठवावे. तसेच अनामत रक्कम पावतीचा क्रमांक व त्याची छायांकीत प्रत मोहरबंद पाकिटावर चिकटवावी. अर्ज प्रशासकीय अधिकारी(घकव्य), छत्रपती शिवाजी मंडई इमारत, ४ था माळा, माता रमाबाई आंबेडकर रोड, मुंबई-४०० ००१ यांच्या कार्यालयात दि.१०/०५/०५ रोजी दुपारी ०१.००वा.पर्यंत आणुन द्यावेत. अर्जदाराने अर्ज देताना सोबत अनामत रक्कमेची मूळ पावती न दाखविता आलेले अर्ज तसेच सूचीत केलेल्या वेळेनंतर प्राप्त झालेले अर्ज न उघडता अर्जदारास परत केले जातील. **अर्ज भरण्याची पध्दती** :- इच्छुक निविदाकारांनी सूचनापत्र तपशीलासह एकक दर व परिमाण सुचीसह स्वाक्षरी करून पाठविणे आवश्यक आहे. त्यामध्ये कोणतीही अनियमितता झाल्यास अर्ज बाद केले जातील.

६	अज्र वाद होऊ नये म्हणून निश्चितपणे पूर्तता करण्याच्या बाबी (Mandatory condition)	खालील बांबीची पूर्तता केलेली नसल्यास अर्ज अपुरे अनियमित व अर्धवट ठरवून पूर्णपणे नाकारले जातील. संस्थेचे प्रतीनीधी ज्यांना निश्चितपणे अधिकार दिले आहेत त्यांनी अर्जावर तसेच हमीपत्राच्या प्रत्येक पानावर स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. दिलेल्या जागी संस्थेच्या पदाधीका-यांची नावे व पत्ते देणे आवश्यक आहे. अर्हता, अर्जामध्ये नमुद केलेली(मागितलेली) सर्व माहिती देणे आवश्यक आहे या बाबतीत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही. अर्जासोबत मागीतलेले आयकर कायम खाते क्रमांक,

		वास्तव्याचा पुरावा, लेखापरिक्षित ताळेबंद आणि इतर आवश्यक कागदपत्र यांची प्रमाणित केले छायांकितप्रती आवश्यक आहेत. अनामत रक्कमेचे अधिदान करुन अर्ज सादर करणे आवश्यक आहे. कागदपत्रांसोबत स्वतःच्या स्वाक्षरीसहीत फोटो देणे आवश्यक आहे. ७) रात्रपाळीतील कामांसाठी रात्रीच्या सफाईसाठी व दिवसाच्या मॉपिंग कामासाठी स्वतंत्र पर्यवेक्षकांची गरज असेल. अशा पर्यवेक्षकाचे नाव व स्वाक्षरीसह फोटो अर्जासोबत असला पाहिजे.
७	काम-वाटप पध्दतीचा तपशील	**कामाचे वाटप करण्याच्या पध्दती** :- महानगरपालिका आयुक्तांनी अर्जदारास साफसफाईचे रात्रपाळीतील किंवा दिवसपाळीतील कोणते काम द्यावयाचे याबाबत सर्व अधिकार राखुन ठेवले आहेत. तसेच अर्जदार कोणतेही काम नाकारु शकत नाही. दिलेल्या पात्रतेच्या कसोटीनुसार अर्जाची छाननी केली जाईल. निवड झाल्यानंतर अर्जाची साफसफाई कामासाठी वर्गवारी करण्यात येईल. साफसफाईच्या कामासाठी प्रत्येक प्राप्त अर्जदाराचे नाव सोडत काढून तसेच 9दिवसा साफसफाई" व 9रात्रीची साफसफाई" यांची वेगवेगळी चिठी काढण्यात येईल. कामाचे युनिट व प्रत्येक अर्जदार यांची सोडत काढली जाईल. अर्जदाराचे नाव व अर्जदारास बहाल केलेल्या साफसफाई युनिटचे नाव जाहिर केले जाईल अशा प्रकारे सर्व साफसफाई बाबतच्या यशस्वी अर्जदारांची सूची जाहिर केली जाईल. प्रतिक्षासुचीसाठी वेगळी सोडत काढली जाईल. जर एवादा अर्जदार त्याला दिलेल्या काम करण्यास असमर्थ ठरला तर प्रतिक्षा सुचीतील क्रमानुसार नावाचा विचार केला जाईल. अर्जदार नेमुन दिलेल्या कामाची आपापसात अदलाबदल करु शकणार नाही. अशा प्रकारची कोणतीही विनंती मान्य केली जाणार नाही व शिक्षा म्हणुन अशा अर्जदारांची अनामत रक्कम जप्त केली जाईल.
८	ठेकेदाराला करावयाचा अधिदान कालावधी	अ) संस्थेच्या प्रतिनिधीने प्रत्येक महिन्याच्या दि.१ ते ४ या कालावधीत संबंधित स.मु.प. यांस देयके सादर करावे. संस्थेच्या प्रतिनिधीने देयक सादर करताना आवश्यक तया कागदपत्रांची पूर्तता केल्याशिवाय संबंधित आवक जावक लिपिक देयक स्विकारणार नाहीत. तशा सूचना संबंधित लिपिकांस देण्यात येतील. आवश्यक कागदपत्रे (देयका समवेत) १) हजेरी पत्रक २) कामगारांस दिलेल्या धनादेश च्य छायांकीत प्रती ३) बँक स्टेटमेंट ४) अवजारे खरेदीची देयके इ. ब) सहाय्यक मुख्य पर्यवेक्षक यांनी प्रत्येक महिन्याच्या ८ तारखेपर्यंत

		देयके परिपूर्ण तयार करून सहाय्यक आयुक्त यांच्या स्वाक्षरीसाठी सादर करावे. तसेच सहाय्यक आयुक्तांनी लेखा अधिका-यांकडे दि.१० तारखेपर्यंत पाठविण्याची व्यवस्था करावी. क) लेखा अधिका-यांनी संबंधित देयकांची छाननी करून संस्थेस सात दिवसांत देयके मिळेल, याची दक्षता ध्यावी.
९	अर्जाची वैधता	अर्ज कामदेण्यासाठीची सोडत काढल्यापासुन किमान १५० दिवस वैध राहतील अर्जदाराने भरलेली अनामत रक्कम वैधतेच्या मुदतपुर्ती पर्यंत बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे राहील.
१०	म.न.पा. आयुक्तांचे निविदेबाबतचे अधिकार	महानगरपालिकेचे आयुक्त कोणतेही अर्ज स्विकारण्यासाठी बांधील नाहीत.
११	कामाचे पुनर्वाटप	ज्या संस्थेला मिळालेले ठराविक काम दुस-या संस्थेला पुनर्वाटप करून देता येणार नाही. हे काम त्याच संस्थेने करणे बंधनकारक आहे.
१२	आवाहन	हे काम बृहन्मुंबई शहर स्वच्छता अभियानांतर्गत असल्याने सर्व निविदाकारांनी कामाचे महत्व जाणून घेऊन कंत्राट अटी / शर्ती नुसार काम करण्यासाठी प्रतिज्ञाबध्द राहावे. निविदा भरताना वरील सर्व बाबींचे, विशेतः बाब क्र.५ व ६, पुन्हा तपासून अंतिम निविदा सादर करावी, ही विनंती.

म.न.पा.आयुक्तांकरिता

परिशिष्ट- १

कामाचा सविस्तर तपशील, अटी /शर्ती इ.

अ) स्वच्छ मुंबई एक शहर हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी रस्ते स्वच्छ करून गोळा केलेल्या कच-याचे संकलन करण्याच्या योजनेमुळे संबंधित परिसरातील नागरिकांना सामावून घेऊन परिणामकारक पर्यवेक्षण आणि संपूर्ण स्वच्छता साध्य करण्याचे निश्चित केले गेले आहे.

स्वच्छता आणि कच-याचे संकलन

मुंबईच्या रस्त्यांची दैनंदिन स्वच्छता व तयाची देखभाल लोकांच्या सहकार्याने / सहभागाने रस्त्यावरील साफसफाई व कच-याची विल्हेवाट लावण्यासाठी सदर कंत्राट काढण्यात आलेले आहे.

सदर काम दिलेल्या नियमावलीप्रमाणे व अटी प्रमाणे एवाद्या व्यक्तीला आपले मनुष्यबळ व उपयोगात येणा-या साहित्याचा वापर करणे व त्या कंत्राटदाराला स्वतः आपल्या विभागात उपस्थित राहणे बंधनकारक आहे. तसेच संबंधित व्यक्ती विभागात हजर नसल्यास, त्याचा करार रद्द होण्यास पात्र ठरेल व नंतर अशा संस्थांची सुरक्षा अनामत व कंत्राट अनामत जप्त करणे आणि काळया यादीत नांव टाकणे व महानगरपालिकेचे कोणतेही काम त्यांना करता येणार नाही अशा तरतूदी केल्या गेल्या आहेत.

ब) कामाचा सविस्तर तपशील :

	❖ दिवसाचे सफाईचे काम :-	
अ	**व्याप्ती / परिक्षेत्र**	एका युनिटमध्ये ९ कि.मीटरचा रस्ता, गल्ल्या, सोबत खुली गटारे यांचा समावेश असेल. साफसफाईच्या कामामध्ये एका युनिट मधील रस्ते, चौक, दुभाजक, पदपथ(फुटपाथ) पाण्याचा निचरा करणारा चर आणि सर्व खुल्या जागावरील स्वच्छता करण्याचा कामाचा समावेश आहे. ज्या युनिटला मंडई संलग्न असेल अशा युनिटचे सफाईचे परिक्षेत्र एकंदर ७ कि.मी. लांबीचा असावा व या ठिकाणी कामगारांची संख्या १८ असणे गरजेचे आहे.
ब	**कामाचे स्वरुप**	१) मोठे रस्ते, छोटे रस्ते, गल्ल्या, उपगल्ल्या फुटपाथ इत्यादींची सफाई. २) व्स्त्यावरील रेती, माती, गोळा करून बाजुला काढणे ३) व्स्त्याच्या कडेला असलेली झुडपे, खुरटलेले गवत, सुका पाला-पाचोळा आणि रस्ता आणि फुटपाथावर पडलेल्या झाडाच्या फांद्या गोळा करून बाजुला करणे. ४) चौक आणि फुटपाथवरील झाडांच्या संरक्षक कुंपणातील स्वच्छता,

		लिटर बिन्स् तसेच गटारातील माती आणि इतर कचरा काढणे / साफ करणे. ५) प्राण्यांचे मलमुत्र, प्लॅस्टीक आणि इतर कचरा गोळा करणे. ६) कचरा संकलन केंद्र, फुटपाथ आणि रस्त्याच्याकडे वरील गाळ आणि खडी, माती तसेच रस्त्याच्याकडेची ३फूट खोलाची गटारे साफ करणे. ७) भिंतीवरील पत्रके व घोषवाक्ये यांचे निर्मूलन करणे. ८) पाऊस, गळती, तुटलेले पाईप्स इत्यादीमुळे साचलेले रस्त्यावरील पाण्याचा निचरा करणे. ९) कचरा संकलन केंद्राभोवती पसरलेला कचरा, कुंडीत व्यवस्थित भरणे. १०) जंतूनाशकांची / चुन्याची फवारणी करणे. ११) रस्त्याच्या स्वच्छतेसाठीची, आवश्यकतेप्रमाणे इतर कामे.
क	**कामाची वेळा (सकाळ पाळी)**	सकाळी ०६.०० ते ११.०० मध्यंततर सकाळी ११.०० ते १२.०० जेवणाची सुट्टी दुपारी १२.०० ते ०३.००
ड	**आवश्यक मनुष्यबळ**	प्रति युनिट साफ सफाईच्या कामासाठी १८ कामगार व १ पर्यवेक्षक नेमावा लागेल व वरील लोकांना खालील साहित्य पुरवावे लागेल.
ई	**आवश्यक साहित्य**	१) ३ हात गाडी २) वेताची टोपली ३) ४ फावडी ४) ४ लोखंडी घमेले(टोपली) ५) १ कामगाराला प्रत्येक महिन्याला २ किलो झाडू ६) स्क्रॅपिंग रॅक ७) १ लोखंडी पहार / टिकाव
फ	**कामाच्या अटी/शर्ती**	१) दोन्ही पाळीच्या सफाईचा आराखडा तयार करुन प्रत्येक युनिट धारकाने (ठेकेदाराने) कार्य आदेश मिळण्यापूर्वी आपल्या युनिटचा आराखडा तयार ठेवावा. ववविवार व सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी सुध्दा काम चालू ठेवणे बंधनकारक आहे. २) हजेरीची वेळ व ठिकाण निश्चित करावी. ३) गणवेष परिधान केलेला पर्यवेक्षक तसेच मूळ ठेकेदार आपल्या युनिटमध्ये सकाळी ०६.०० ते ०३.००पर्यंत (सकाळी ११.०० ते १२.०० पर्यंत जेवणाची सुट्टी वतिरिक्त) या कालावधीमध्ये स्वतः भ्रमणदुरध्वनी व ओळखपत्रासहीत आपल्या युनिटमध्ये उपस्थित असणे

		आवश्यक आहे. ४) ठेकेदाराच्या जागी इतर कोणाचीही उपस्थिती चालणार नाही. ५) कामाचा दैनंदिन अहवाल ठेकेदाराने ठराविक तक्त्यामध्ये पूर्ण भरुन संबंधित महानगरपालिकेच्या अधिका-यास द्यावा. ६) वरील दिलेल्या कामाव्यतिरिक्त ठेकेदाराने महानगरपालिकेच्या अधिका-याने दिलेल्या आदेशानुसार तत्कालीन अतिरिक्त कामे (आपल्या युनिटमध्ये) करावी लागतील. वरील सूचना उदाहरणादाखल आहेत. पण संपूर्ण नाहीत.
२	**❖रात्रीचे सफाईचे काम :**	
अ	**व्याप्ति/ परिक्षेत्र**	एकुण ४ कि.मी. लांबीचा मुख्य रस्ता याला एक एकक असे संबोधिले जाईल. साफ सफाईच्या कामामध्ये एका युनिटमधील रस्ते, चौक, दुभाजक, पदपथ(फुटपाथ) पाण्याचा निचरा करणारा चर आणि सर्व खुल्या जागावरील स्वच्छता करण्याच्या कामाचा समावेश आहे. परंतु, मंडईच्या बाबतीत परिक्षेत्र हे ७ कि.मी. लांबीचे असावे व कामगारांची संख्या मात्र १८ असणे गरजेचे आहे.
ब	**कामाचे स्वरुप**	❖ कागद,प्लॅस्टीक, गाळ, खडी, प्राण्यांची विष्ठा इतर गोळा करुन व कचरा कुंडीवर टाकणे. ❖ रस्त्यावरील व दुभाजकावरील माती, गाळ, वाळू स्क्रॅपरने घासुन काढणे. ❖ प्रमुख रस्ते, फुटपाथ, दुभाजक यांची सफाई करणे. ❖ चौक आणि फुटपाथवरील झाडांच्या संरक्षण कुंपणातील व लिटर बिन्सची स्वच्छता तसेच गटारातील माती आणि इतर कचरा स्वच्छ करणे ❖ रस्त्याच्या कडेला असलेली झुडुपे, खुरटलेले गवत, सुका पाला-पाचोळा, रस्ता आणि पुटपाथवर पडलेल्या झाडांच्या फांद्या गोळा करुन बाजूला करणे. ❖ भिंतीवरील पत्रके व घोषवाक्य यांचा निमूर्लन करणे. ❖ कचरा संकलन केंद्रे, फुटपाथ आणि रस्त्याच्या कडेवरुन गाळ आणि खडी माती यांचे ढिगारे तसेच झाडांच्या टाकाऊ फांद्याा इत्यादी गोळा करणे. ❖ व्स्त्याकडेची गटारे साफ करणे. ❖ पाऊस, गळती, इत्यादीमुळे सांचलेल्या रस्त्यावरील पाण्याची सफाई करणे ❖ दिवसपाळीमध्ये रस्ते व विभाजक इत्यादीवरील कचरा साफ करणे. ❖ मुख्य रस्ते, फुटपाथ, दुभाजक, इत्यादीवरील गाळ, माती, वाळू,

		कागदे स्क्रॅपींग करून गोळा करणे. ❖ कचरा उचलल्यानंतर तेथे जंतूनाशक पावडर आणि चुन्याची फवारणी करणे.
क	**कामाच्या वेळा**	रात्री ११.०० ते सकाळी ०५.०० (मुख्य साफसफाईचे काम) पहाटे ०२.०० ते ०३.००विश्रांती व चहापान वेळ सकाळी ०७.०० ते दुपारी ०४.०० (मॉपिंग कचरा उचलणे)
ड	**मनुष्यबळ, साधन आणि यंत्रसामुग्रीचे परिमाण**	प्रति युनिट साफ सफाईच्या कामासाठी १८ कामगार व १ पर्यवेक्षक रात्रपाळी सफाईसाठी नेमावा लागेल आणि ८ कामगार दिवसा मॉपींगसाठी वरील लोकांना खालील साहित्या पुरवावे लागेल. १) ३ हात गाडया २) वेताची टोपली ३) ४ फावडी ४) लोखंडी घमेले ५) प्रत्येक कामगाराला प्रत्येक महिन्याला ३ किलो झाडू ६) स्क्रॅपिंग रॅक ७) १ लोखंडी पहार / टिकाव ८) प्रत्येक कामगारास एक परावर्तीत जॅकेटे.
